माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : ३८/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. रामस्वामी दुर्गय्या सुद्दाला,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय**
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय**
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १९.०७.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०५.११.२०१९ | --- | ०६.०२.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ७०६/२०१९ मध्ये दिनांक ०५.११.२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १९.०७.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर, श्री. श्रीधर बाळकृष्ण राजमाने उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या तर्फे तहसिलदार (सामान्य) जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर, श्री. श्रीधर बाळकृष्ण राजमाने उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ७०६/२०१९ मध्ये दिनांक ०५.११.२०१९ रोजी सुनावणी घेवून " प्रस्तुत व्दितीय अपील मंजूर करण्यात येत असून अपीलार्थी यांनी जोडपत्र "अ", प्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी कलम २(च) नुसार उपलब्ध आहे तशा स्वरुपात अपीलार्थीस कलम ७(६) नुसार १५ दिवसात विनामुल्य उपलपब्ध करुन द्यावी व त्याची पोहच आयोगास पाठवावी, " असे आदेशीत करुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०६.०२.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. ७०६/२०१९ मध्ये दिनांक ०५.११.२०१९ रोजी पारित केलेला आदेश प्रत्यक्षात दि. १५.०२.२०२० रोजी निर्गमित करण्यात आला. सदर आदेशात अपिलार्थी यांनी बोरींगच्या माध्यमाने हजारो लिटर पाण्याचा गैरवापर व नासाडी करीत पिण्याचे पाण्याची कृत्रीम टंचाई निर्माण करण्याबाबत तक्रार दि. १४.०५.२०१८ रोजी दिली असता सदर पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. त्यानुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांनी अपिलार्थी यांना नगर परिषद बल्लारपूर यांचा दि. १७.०७.२०२३ रोजीचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर केला आहे. तसेच वरील प्रकरण कालबाह्य झाले असून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १९.०७.२०२३**

**जा.क्र.** 7317 **दि.**

29 DEC 2023